स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

ज्ञानतीर्थ परीसर, विष्णुपूरी, नांदेड

मानव विज्ञान विदाशाखे अंतर्गत भुगोल विषयातील विद्यावाचस्पती
(पीएच. डी.) पदवीसाठी प्रबंधाचा सारांश

किनवट व माहूर तालुक्यातील लोकसंख्या व वस्त्यांचा तूलनात्मक अभ्यास
(2001 - 2021)

संशोधक

श्री. मेटकर अशोक गोविंदराव

(M.A (Geo., Edu.) B.P. Ed, M. Phill)

मुख्य अधिक्षक, इंदिरा इंटरनॅशनल पब्लिक स्कूल, विष्णुपूरी, नांदेड

मार्गदर्शक

डॉ. गौंड नामदेव संपतराव

(M.A. B.ed, M. Phill, P.hd.)

भाई किनशनराव देशमुख वरिष्ठ महाविदालय,
चाकूर ता. चाकूर जि. लातूर - 431 513.

संशोधन केंद्र

महात्मा गांधी महाविद्यालय अहमदपूर
ता. अहमदपूर जि. लातूर - 433 515.

किनवट व माहूर तालुक्यातील लोकसंख्या व वस्त्यांचा तूलनात्म्क अभ्यास

(2001 - 2021)

1.1 प्रस्तावना :-

परिस्थितिकी शास्राप्रमाणे वस्ती ही सजीवांच्या निवासस्थळांचा बोध करून देणारी संज्ञा आहे त्या ठिकाणी त्या विशिष्ट सजीवाला आवश्यक असणारे पर्यायवरणीय घटक उपलब्ध आहेत व तो सजीव तेथे कायम अथवा तात्पूरता निवासी आहे. पृथ्वी वरील विविध घटकांशी भूगोलाचा संबंध आहे. भुगोलाच्या अभ्यासात मानवाचा अंतर्भाव करण्यात आल्यामुळे विषयाचे स्वरूप अधिक गुंतागुंतीचे होत गेले. भारतातील तसेच जगातील वाढत्या लोकसंख्येमुळे अलीकडील काळात लोकसंख्या वाढ हा सर्वांच्या जिव्हाळयाचा विषय बनला आहे कारण लोकसंख्या वाढीमुळे निर्माण होणाऱ्या गंभीर परिणामाना सर्वांनाच सामोरे जावे लागत आहे. लोकसंख्या हा घटक कोणत्याही देशाच्या संदर्भात अतिशय महत्त्वाचा असतो. कारण देशाचे आकारमान, वैशिष्टे विभाजन रचना, राहणीमान, प्रगती, विकास, सामाजिक रचना हे घटक लोकसंख्येमुळे प्रभावीत होत असतात.

वस्ती हा मानवी संस्कृतीचा एक अवष्किार असतो मानवी गरजा या माठया प्रमाणावर नैसर्गीक परिस्थीतीवर अवलंबून असतात त्यामुळे मानवाचे पर्यावरणाशी चांगले संबंध असणे अत्यंत महत्त्वाचे असते. वस्ती हा मानव आणि निसर्ग यांच्या क्रिया प्रक्रियाचा एक आलेख असतो. प्रत्येक वस्तीचा आकृतीबंध वेगळा असतो. वस्त्याचे वितरण वेगवेगळे झालेले असते. त्या सर्व बाबीवर प्राकृतीक घटकामुळे एक विशिष्ट पार्श्वभुमी प्राप्त झालेली असते. मानवाचा धर्म, आर्थिक स्थिती, सामाजिक स्थिती, सामाजिक पध्दतीचा ठसा वस्त्यावर पडलेला असतो. या संदर्भात विविध पातळीवर अनेक संशोधन होत आहेत.

सदरील संशोधनात देखील स्थानिक पातळीवरील नांदेड जिल्हयातील किनवट व माहूर तालुका क्षेत्रातील लोकसंख्या व वस्त्यांचा तुलनात्मक शास्त्रीय दृष्टीकोनातून अभ्यास केला जाणार आहे या मध्ये अभ्यास क्षेत्रातील लोकसंख्येचे वितरण त्या वितरणावर परिणाम करणारे घटक, लोकसंख्येचे लिंगगुणोत्तर, स्त्री-पुरूष साक्षरतेचे प्रमाण तसेच लोकसंख्येची घनता. या घटका बरोबरच संशोधन क्षेत्रातील वसाहतीचा अभ्यास केला जाणार आहे.

नांदेड जिल्हयातील किनवट व माहूर तालूक्यात पैनगंगेच्या निसर्गरम्य अशा घनदाट जंगलात दरीखोर्यातून आपणांस विविध जमातीच्या वस्त्या पहावयास मिळतात. तेथल तुरळक लोकसंख्या व तुरळक लोकांच्या प्रकारातील वस्ती पहावयास मिळते. या वसाहतीवर विविध भौगोलीक बाबीचा परिणाम आपणास

विशिष्ट स्वरूपात पहावयास मिळतो. डोंगर, दऱ्या खोऱ्या, जंगल तर कधी सपाट मैदान यामुळे या सर्व बाबीचा परिणाम येथील वसाहतीवर आलेला आहे. या कुतुहलापोटी प्रस्तूत संशाधनात किनवट व माहूर तालुक्यातील वसाहतीचा वेगवेगळया अनुषंगाने अभ्यास केला जाणार आहे. ज्यामध्ये प्रामुख्याने वस्त्यांचा आकार, विकास, वस्त्यांचे वितरण, वर्गीकरण प्रकार इ. वैशिष्टयांचा शास्त्रीय पध्दतीने अभ्यास केला जाणार आहे.

1.2 अभ्यास क्षेत्र :-

अभ्यास क्षेत्राची निवड करत असतांना सदरील विषय या अगोदर संशोधनासाठी कोणीही घेतलेला नाही. या बाबींचा विचार करण्यात आला असून लोकसंख्या व वसाहतीचा संशोधनात्मक अभ्यास करण्यासाठी किनवट व माहूर हे दोन तालुके अभ्यासावेत म्हणून निवडलेली आहे. किनवट व माहूर तालूक्यातील वसाहती व लोकसंख्येचा भौगोलिक अभ्यास सन 2001 - 2021 या विषयावर संशाधनात्मक अभ्यास करण्यात येणार आहे. किनवट व माहूर हे नांदेड जिल्हयातील अतिशय महत्तवाचे तालुके असून या तालूक्याच्या उत्तर पश्चिमेला यवतमाळ जिल्हा व नांदेड जिल्हयातील हिमायतनगर तालूका असून पूर्व पश्चिमेला तेलंगणा राज्याच्या सिमा असून याचे अक्षयवृत्तीय विस्तार 19' 63^0 उत्तर व रेखावृत्तीय विस्तार 78' 2^0 पूर्व असा आहे. राज्य समुद्र सपाटीपासून सरासरी उंची 314 मीटर (1030 फूट) आहे. पैनगंगा नदी शहराच्या बाजूने वाहते तर नागझरी धरण तिच्यापासून अवघ्या काही कीमी अंतरावर आहे. जवळच्या रहिवाश्यांसाठी धरण हा एकमेव पाण्याचा स्त्रोत आहे. किनवट व माहूर - मांडवी रोडवर काही मोठया प्रमाणावर शेती आहे. किनवटमध्ये विस्तीर्ण जंगले असून इस्लापूर येथे धबधबा आणि उनकेश्वर येथे गरम पाण्याचे झरे आहेत.

यासोबतच माहूर तालूक्याचा विचार करता अक्षवृत्तीय विस्तार 19^0 50' - 52 उत्तर आणि रेखावृत्तीय विस्तार 77' 55' - 26 पूर्व असा असून नांदेड जिल्हयात एक धार्मिक स्थळ आहे. माहूर येथे रेणूकादेवीचे प्राचीण मंदीर आहे. व दत्तात्रय यांचे जन्मस्थान असून दत्तात्रय माता पिता अत्रीरूषी आणि सती अनुसया येथे राहत होत्या. रेणूकामाता मंदीर, भगवान दत्तात्रय आणि अनुसया माता हे तिनही मंदीरे निमपर्वतावर बांधलेली आहेत माहूर हे झाडे व वन्यजिवी समृध्द जंगलाने वेढलेले आहे या जंगलात मोर, हरीण, काळवीट, अस्वल यांच्या पाउलखूणा मोठया प्रमाणावर आढळतात तसेच एका पर्वतावर 12 व्या शतकात बांधलेला प्राचीण किल्ला पण आहे. अकबराच्या राजवटीत बोंढार सुना (राज्य) मधील वीस परगणे शहर असलेला हा किल्ला होता.

1.3 उदीष्टे :-

1) किनवट व माहूर तालूक्याचा लोकसंख्येच्या दृष्टीने अभ्यास करणे.
2) किनवट व माहूर तालूक्यातील वस्त्यांच्या वितरणाचा अभ्यास करणे.
3) किनवट व माहूर तालूक्यातील प्राकृतीक रचनेचा अभ्यास करणे.
4) किनवट व माहूर तालूक्यातील लोकसंख्येच्या स्थलांतराची कारणे व परिणामाचा अभ्यास करणे.
5) किनवट व माहूर तालूक्यातील सामाजिक, सांस्कृतिक, अर्थिक व भौगोलिक रचनेचा अभ्यास करणे.
6) किनवट व माहूर तालूक्यातील वस्त्यां व त्यांच्या प्रकाराचा अभ्यास करणे.
7) किनवट व माहूर तालूक्यातील वस्त्यांचा मुलीच्या शैक्षणिक प्रगतीवर होण्ारया परिणामाचा अभ्यास करणे.
8) किनवट व माहूर तालूक्यातील मुलीच्या शैक्षणिक प्रगतीसंदर्भात नियोजनात्मक व विकासात्मक आराखडा तयार करणे.
9) किनवट व माहूर तालूक्यातील वस्त्यांच्या शैक्षणिक विकासासाठी योजना सुचविणे.

1.4 गृहीतके :-

1) शहरी भागांच्या तुलनेने ग्रामीण लोकसंख्येचे साक्षरता प्रमाण कमी असते.
2) शहरी भागांच्या तुलनेने ग्रामीण लोकसंख्येची घणता कमी असते.
3) ग्रामीण रस्त्यांचा आकार वेगवेगळा असतो.
4) अर्थिक घटकावर लोकसंख्याचे स्थलांतर अवलंबून असते.
5) नैसर्गिक साधनसंपत्तीच्या ठिकाणी ग्रामिण लोकसंख्येची वस्ती जास्त प्रमाणात असते.
6) भौगोलिक व सांस्कृतीक घटकांच्या अनुकूलतेवर वस्त्यांची वाढ अवलंबून असते.

1.5 संशोधन पध्दती :-

सदरील संशोधन करण्यासाठी प्राथमिक व दुय्यम स्वरूपाची माहिती वापरण्यात येणार आहे तसेच आकडेवारीचा सुध्दा वापर करणार आहेत. प्राथमिक स्वरूपाच्या माहितीसाठी संशोधन कार्यासाठी निवडलेल्या क्षेत्रातील ग्रामीण व शहरी वसाहतीचे सर्वेक्षण मुलाखती व प्रश्नावलीचा उपयोग करण्यात येणार आहे.

दुय्यम स्वरूपाच्या आकडेवारी व माहितीसाठी इंटरनेट, जिल्हासमालोचन, मागील संशोधन अहवाल, कृषी विकासातील माहिती, स्थान निर्देश व कार्य, जिल्हासंदर्भ ग्रंथ, वेबसाईटस सदरील संशोधन विषयाशी निगडीत मिळालेल्या माहितीचा वापर करण्यात येणार आहे.

संकलीत माहितीचे विश्लेषन करण्यासाठी विविध नकाशे, आलेख व आकृत्यांचा वापर करण्यात येणार आहे. आलेखाच्या साहाय्याने माहितीचे विश्लेषन करण्यात येणार आहे.

1.6 साहित्याचे पुनरावलोकन :-

मानव व वस्त्यांचा विचार करता सर्वच ठिकाणी सारखा विकास झालेला नाही काही भागात जास्त तर काही भागत खूपच कमी स्वरूपात विकास झालेला आपणांस पाहावयास मिळतो. ज्या भागात लोकांना पाण्याची उपलब्धता, सुसहय हवामान, सुपीक जमीण उपलब्ध झाल्या त्या ठिकाणी वस्त्या विकसीत झाल्या. ग्रामीण वस्ती म्हणजे ज्या मानव वस्तीमध्ये बहुसंख्ये लोकांचे मुळ व्यवसाय स्थानिक नैसर्गिक साधनसंपत्तीशी निगडीत असतात उदा. शेती, मासेमारी, लाकूडतोड, जंगलातील डिंक जमा करणे, झाडाची मोह जमा करणे, झाडावर बसलेली मोहळे झाडणे इ. अशा वस्त्यांना ग्रामिण वस्ती म्हणजे गाव म्हणतात. यातूनच हळूहळू विकास होउन त्याचे नागरी वस्तीत रूपांतर होउन त्यांना नगर किंवा शहर म्हणतात.

1.7 कामाची योजना :-

प्रथम वर्ष

1) संबंधीत विषयाच्या संशोधनाच्या माहितीसाठी विविध विषयावरील प्रकाशीत साहित्याचे पुनरावलोकन करणे.
2) विविध संख्या व अप्रकाशित विविध संशोधन साहित्याचा आढावा घेणे.
3) विविध दुय्यम स्त्रोताकडून माहिती गोळा करणे.
4) प्रत्यक्ष गावी जावून संशोधनाशी निगडीत माहिती गोळा करणे.
5) संग्रहीत साहित्याचे विश्लेषन करणे.
6) नकाशे व आलेखाच्या पध्दतीने माहिती दर्शविणे.

व्दितीय वर्ष

1) मिळालेल्या माहितीचे योग्य स्वरूपात वर्गीकरण करून मांडणी करणे.
2) विश्लेषन केलेल्या माहितीचा अर्थ, उद्दिष्ठ प्राप्तीसाठी निष्कर्ष व उपाययोजना लिहिणे.
3) वर्षाच्या शेवटी प्रस्तूत प्रबंध विद्यापीठाने दिलेल्या नियम व अटीची पूर्तता करून विद्यापीठात सादर करणे.

1.8 मागील संशोधनाचा आढावा :-

इतर विविध संशोधनाप्रमाणेच शैक्षणिक क्षेत्रातील उद्दीष्ठे, पध्दती आणि निष्कर्षानुसार त्यांचे वर्गिकरण करण्याची पध्दत आहे. संशोधनासाठी काही घटना अशा असतात त्या भूतकाळात घडून गेलेल्या असतात, काही घटनांचा अभ्यास आज त्याचं जसे स्वरूप आहे त्या आधारावर केला जातो तर काही घटनांचे भविष्यकालीन स्वरूप जाणण्यासाठी वर्तमान काळात प्रयोग करावे लागतात यासाठी संशोधनात विविध घटनांशी संबंधीत चले, तथ्य व संबंधाचा अभ्यास केला जातो.

1.9 प्रकरण योजना :-

सदरील किनवट व माहूर तालुक्यातील लोकसंख्या व वस्त्यांचा तुलनात्म्क अभ्यास या शिर्षकाखालील संशोधन कार्य पूढील आठ प्रकरणात विभागले जाणार आहे.

❖ English References :

Arora, K. L. (1987) : The Teaching of Geography, Ludhiyana : Prakash Brother's Educationala

Best, J. W. (2000) : Research in Education, New Delhi : Prentice Hall of India PVT. Ltd

Buch, M. B. (1986) : Third Survey of Research in Education, 1978 - 1983 (Pol-ii) Delhi : National Council of Educational Research & Training.

Buch, M. B. (1991) : Fourth Survey of Research in Education, 1983 - 1998 (Pol-ii) Delhi : National Council of Educational Research & Training.

Buch, M. B. (1997) : Fifth Survey of Research in Education, 1988 - 1992 (Pol-i) Delhi : National Council of Educational Research & Training.

Buch, M. B. (2000) : Sixth Survey of Research in Education, 1993 - 2000 (Pol-i) Delhi : National Council of Educational Research & Training.

Kothari, C. R. (2000) : Research Methodology methods & Technique, New Delhi : Wiley Eastern Ltd, Publisher

Patil A. T. (2005) : Development of multimedia instructional system on computer education for B.ed. public teachers Ph.D. Thesis Kolhapur : Shivaji University.

Wikipedia the three Encyclopedia, water resources Retireved 22 June 2012 from http://en.wikipedia.org/wiki/water/resources

1.10 संदर्भ ग्रंथ :-

1) अहिरराव वा. र. 1977 : अधिवास भूविज्ञान, निराली प्रकाशन पूणे पृ क्र 1.9

2) पेंडसे एस. डी. 1965 : महाराष्ट्राचा सांस्कृतीक इतिहास, सुविचार प्रकाशन मंडळ पुणे पृ क्र. 110, 115

3) जिल्हा जनगनणा अहवाल : 2001, 2011, 2021.

4) वर्मा, लक्ष्मिनारायन व्हि. 1983 : अधिवास भुगोल पृ क्र 23, 25.

5) उपाध्याय, दिनकर प. 1991 : ग्रामिण वस्ती भुगोल पृ क्र 70, 75.

6) सामाजिक व अर्थिक समालोचन : 2001, 2011, 2021.

7) भारतीय स्थलदर्शक नकाशा.

8) Aaroussean, M. 1920 : The Arrangement of Rural Publication Geographical Reviews, Vol - 10, P. No. 223

9) Ahemed, E. 1952 : Rural Settlement Types in the Uttar Pradesh Annas, A. A Geography P. No. 222, 246

10) http://nanded.gov.in.

संशोधक

श्री. मेटकर अशोक गोविंदराव

(M.A (Geo., Edu.) B.P. Ed, M. Phill)

मुख्य अधिक्षक, इंदिरा इंटरनॅशनल पब्लिक स्कूल, विष्णुपूरी, नांदेड

मार्गदर्शक

डॉ. गौंड नामदेव संपतराव

(M.A. B.ed, M. Phill, P.hd.)

भाई किनशनराव देशमुख वरिष्ठ महाविदालय, चाकूर ता. चाकूर जि. लातूर - 431 513